# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)


म्हाडा
MHADA

दि.१६/१०/२०१८ चे
बैठकीचे इतिवृत्त

जा.क्र.मुं.मं./का.अ./बीडीडी/ /२०१८
दिनांक :- / /२०१८

विषय :- ना.म.जोशी मार्ग बी.डी.डी. पुनर्विकास प्रकल्पाबाबत मा.अध्यक्ष महोदय म्हाडा यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६/१०/२०१८ रोजी दु.०४.०० वाजता त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीस खालील सन्माननीय लोकप्रतिनिधी, अधिकारी व विविध बीडीडी चाळ संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राहुल शेवाळे | - मा. खासदार, दक्षिण- मध्य मुंबई |
| २. | श्री. सुनिल शिंदे | - मा. आमदार, वरळी विधानसभा |
| ३. | श्रीमती स्नेहलता आंबेकर | - मा.माजी महापौर व नगरसेविका |
| ४. | श्री. धिरजकुमार पंदिरकर | - उपमुख्य अभियंता / बीडीडी / मुं.मं. |
| ५. | श्री. सुनिल भडांगे | - उपअभियंता / बीडीडी मुं.मं. |
| ६. | श्री. शिरीष नेहते | - शाखा अभियंता / बीडीडी मुं.मं. |
| ७. | श्री. समाधान ढोकणे | - सहा. अभियंता / बीडीडी मुं.मं. |
| ८. | श्री. यु.एस. भिसे | - उपसमाज विकास अधिकारी |
| ९. | श्री. कृष्णकांत नलगे व इतर | - बी.डी.डी. चाळ ना.म.जोशी मार्ग भाडेकरु संघटना |

बैठकीत उपस्थित स्थानिक लोकप्रतिनिधी, संघटना प्रतिनिधी व भाडेकरु यांच्याबरोबर खालील विषयांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्याबाबत मा. अध्यक्ष, म्हाडा यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिले.

| अ. क्र. | विषय | संबंधित अधिकारी | संबंधित विभाग | बैठकीमध्ये घेण्यात आलेला निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १. | बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग येथील पुर्नविकासाच्या पहिल्या टप्प्यातील अद्याप पात्रता निश्चिती न झालेल्या भाडेकरु व स्टॉल्सधारक यांची पात्रता | संचालक बीडीडी<br><br>सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुलाबा | सार्वजनिक बांधकाम विभाग<br><br>सक्षम प्राधिकारी कार्यालय | • . संचालक बीडीडी यांनी भाडेकरुंच्या दस्ताऐवजांमुळे सक्षम प्राधिकारी यांना पात्रता निश्चित करणे शक्य नसलेल्या उर्वरित अंदाजे ४३ भाडेकरुंचे दस्तऐवज (हस्तांतरण आदेश, करारनामा, भाडे नोंदवही इ.) सक्षम प्राधिकारी यांना तात्काळ सादर करावीत.<br>• याबाबत पाहिल्या टप्प्यातील अनिर्णित भाडेकरुंची व ७८ स्टॉल्स व झोपड्डीधारक इ.ची पात्रता युध्द पातळीवर कार्यवाही पुढील १ महिन्यात पूर्ण करण्यात यावी. |


गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.
दूरध्वनी ६६४० ५०००, २६५९२८७७, २६५९२८८१
फॅक्स नं. ०२२-२६५९२०५८ / पत्रपेटी क्र. ८१३५

Griha Nirman Bhavan,Kalanagar, Bandra (East), Mumbai-400 051.
Phone : 66405000, 26592877, 26592881.
Fax No. : 022-26592058 / Post Box No. 8135
Website : mhada.maharashtra.gov.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग पुर्नविकास प्रकल्पांअंतर्गत नव्याने अंतर्भूत करण्यात आलेल्या तीन चाळ क्र.१३, १४, १५ मधील भाडेकरुंची पात्रता | सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुलाबा<br><br>कार्यकारी अभियंता, बीडीडी | सक्षम प्राधिकारी कार्यालय<br><br>संचालक बीडीडी | • चाळ क्र.१३ मधील भाडेकरुंच्या विरोधामुळे दि.०५-१०-२०१८ रोजी नियोजित सर्वेक्षण होऊ शकले नाही. सक्षम प्राधिकारी यांनी पुनश्च नोटीस बजावून सर्वेक्षणाची कार्यवाही करण्यात यावी. चाळ क्र.१४ व १५ मधील सर्वेक्षण करण्यात आलेल्या भाडेकरुंची पात्रता तात्काळ निश्चित करण्यात यावीत.<br>• संचालक बीडीडी यांनी बीडीडी चाळी च्या लाभार्थ्यांच्या पात्रता निश्चितीसाठीच्या दि.२४/०४/२०१८ च्या शासन निर्णयानुसार आवश्यक कागदपत्रे सक्षम प्राधिकारी यांना उपलब्ध करुन दयावी. |
| ३. | बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग पुर्नविकास प्रकल्पांअंतर्गत नव्याने अंतर्भूत करण्यात आलेल्या तीन चाळ क्र.१३, १४, १५ लाभार्थ्यांना संक्रमण गाळयांचे वितरण कोणत्या संक्रमण शिबीरात करणार ते निश्चित करणे. | मुख्य अधिकारी मुं.मं./ उपमुख्य अभियंता बीडीडी, समुअ मुं.मं. | बीडीडी मुं.मं.<br><br>सहमुख्य अधिकारी, मुं.मं. | या चाळीतील भाडेकरुंना पर्यायी जागा देण्यात येणारे संक्रमण शिबीरांच्या गाळयांची जागा निश्चित करण्यात यावी. |
| ४. | बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग येथील पुर्नविकासाच्या तीनही टप्प्याच्या पुर्नविकासाचा कालबध्द कार्यक्रम सादर करणे. | उपमुख्य अभियंता | बीडीडी मुं.मं. | बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग पुर्नविकास प्रकल्पाच्या तीनही टप्प्याचा कालबध्द कार्यक्रम सादर करण्यात यावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | बीडीडी चाळ व्यतिरिक्त पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यातील कामगार विभागाची बांधकामे जसे ललित कला भवन, आरोग्यधाम इ. रिक्त करणे | कामगार आयुक्त | कामगार कल्याण विभाग | पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यातील कामगार कल्याण विभागाच्या ताब्यातील ललित कला भवन, आरोग्यधाम / व्यायामशाळा, संलग्न शौचालय, आरोग्य धाम अशी ४ बांधकामे तात्काळ रिक्त करुन पुनर्विकासासाठी म्हाडास हस्तांतरित करावीत. |

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

**मा.अध्यक्ष / म्हाडा यांच्या मान्यतेने.**

( दीपेन्द्र सिंह कुशवाह)
मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ

जा.क्र.का.अ./मुं.मं./बीडीडी- / 1061 /२०१८
दिनांक :- 17/12/2018.

प्रति,
श्री.राहुल शेवाळे
मा.खासदार, दक्षिण-मध्य मुंबई

श्री.सुनिल शिंदे
मा.आमदार, वरळी विधानसभा

श्रीमती स्नेहलता आंबेकर
मा.माजी महापौर व नगरसेविका

विषय :- ना.म.जोशी मार्ग बी.डी.डी.पुनर्विकास प्रकल्पाबाबत मा.अध्यक्ष महोदय म्हाडा यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६-१०-२०१८ रोजी दु.०४.०० वाजता त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

विषयांकित बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीस्तव सोबत सादर करीत आहे.

आपला विश्वासू

(दीपेन्द्र सिंह कुशवाह)
मुख्य अधिकारी
मुंबई मंडळ

प्रत :- विशेष कार्यअधिकारी (OSD) मा. अध्यक्ष म्हाडा यांचे कार्यालय यांना माहितीसाठी.